Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN – 2349-3984
IMPACT FACTOR 5.686

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

(A QUARTERLY PEER REVIEWED JOURNAL)

**Special Issue – 1**

**Manavlok's (Marathwada Navnirman Lokayat) College of Social Work, Ambajogai Dist Beed**

**Organizing**

**one day National Seminar**

**on the occasion of**

**Lokraja Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj commemorative Centenary Year and the Birth Anniversary of Dr. Dwarkadasji Lohiya (Babuji)**

**on**

# "Contribution Of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj In Social Development"

Date : 07th September 2022

**Editor**

Dr. Prakash Jadhav, Principal

Sukeshini Jogdand, Assistant Professor

Dr. Hanumant Salunke, Assistant Professor

---

MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL WORK, AMBAJOGAI
Post Box No-23
Ring Road, Ambajogai, Dist. Beed, (MS) Pin -431517
E-mail:-manavlok1999@gmail.com
Website:- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

**Manavlok Research Bulletin**

**Sept. 2022 - Special Issue ISSN -2349-3984 Impact Factor 5.686**

## CONTENTS


| Sr. No | Name of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | "लोकराजा शाहू महाराजांचा समग्र विकासाचा दृष्टिकोन"<br>सुभाष वारे | 02 |
| 2 | परीवर्तनाच्या चळवळीतील आमचे प्रेरणास्थान : बाबुजी<br>डॉ. प्रकाश जाधव | 07 |
| 3 | राजर्षी शाहु महाराज यांचे आधुनिक समाज निर्मीतीतील योगदान: एक अभ्यास<br>प्रा.डॉ. मेघराज ए. कपुरडेरीया | 10 |
| 4 | राजर्षी शाहू महाराज : स्त्रीमुक्ती सुधारणेचा अभ्यास<br>डॉ. प्रकाश जाधव | 19 |
| 5 | लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक विचार व सद्यस्थिती<br>डॉ. हनुमंत अंगदराव साळुंके | 26 |
| 6 | छत्रपती शाहू महाराजांचे व्यापार विषयक धोरण<br>प्रा. डॉ. अशोक चव्हाण | 33 |
| 7 | छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांची राष्ट्रबांधणीतील राजकीय दुरदृष्टी<br>प्रा. सुकेशिनी संजय जोगदंड, | 42 |
| 8 | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विकासातील योगदान<br>प्रा.जोगदंड मकरंद बळीराम | 49 |
| 9 | राजर्षी शाहू महाराज यांचे वंचित घटकाच्या पुनरूत्थानातील योगदान:- राजर्षी शाहू महाराज – परिचय<br>Mr. Datta K. Karande | 53 |
| 10 | राजर्षी शाहु महाराज यांचे कृषी व सिंचन क्षेत्रातील योगदान<br>महेश मुरलीधर मुंडे | 60 |
| 11 | राजर्षी छत्रपती शाहु महाराजांचे सामाजीक योगदान<br>प्रा.डॉ. नरसिंग आबासाहेब पवार | 67 |
| 12 | राजर्षी शाहु महाराज यांचे कृषी व सिंचन क्षेत्रातील योगदान<br>प्रविणकुमार मधुसूदन लोणारे | 70 |


Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

# छत्रपती शाहू महाराजांचे व्यापार विषयक धोरण

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

प्रा. डॉ. अशोक चव्हाण
वाणिज्य विभाग,
रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

**प्रस्तावना:**

राजर्षी छत्रपती! ते अष्टावधानी होते हे तर खरेच, शिवाय ते खरे कर्मवीर होते. त्या कर्माला शिस्त आणि विचार यांची जोड होती. म्हणूनच त्यांची विचारक्रांती यशस्वी झाली. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना "राजर्षी" ही पदवी कानपूरच्या कुर्मी समाजाने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात. त्यांचे आर्थिक विचार आज हि उपयुक्त आहे रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी सहकार, सामाजिक, कृषी, उद्योग, आदी विविध क्षेत्रांत भरीव कार्य केले.

राजर्षी शाहूंच्या वेळच्या कालमान, परिस्थिती यांचा वेध घेता त्यांनी जे काही निर्णय घेतले, ते काल सुसंगतच म्हणावे लागतील. काही निर्णय भविष्याच्या दृष्टीने विसंगत वाटत होते. तरीसुद्धा प्राप्त स्थितीला सामोरे जाण्यासाठी ते निर्णायक क्षणच मानले पाहिजेत. ते ब्रिटिशांचे मांडलिक राजे होते, म्हणून त्यांच्या कार्याला खूप मर्यादा होत्या. त्या मर्यादेत राहूनही त्यांचे कार्य उदंड मानावे लागेल. हे सारे पार पाडताना त्यांना किती क्लेश झाले असतील हे लक्षात घेणे गरजेचे आहे. तरीही परिस्थितीला पुरून उरलेला हा राजा कसलेला सेनानीच होता. तो लढवय्या तर आहेच, शिवाय तो हुशार, बुद्धिमान, मुत्सद्दीही आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट:**

1 छत्रपती शाहू महाराज यांच्या व्यापार व आर्थिक विचारांचा अभ्यास करणे
2 शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या सोडवण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले प्रयत्न यांच्या अभ्यास करणे
3 छत्रपती शाहू महाराजांच्या व्यापार व व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यास करणे

शाहू महाराजांच्या कालखंडात राज्यकर्त्यांनी कर गोळा करावा आणि संरक्षण आणि आपल्या राज्य हद्दीतील अंतर्गत कायदा, सुव्यवस्था पाहावी एवढीच मर्यादित कार्ये राज्यकर्ते आपली मानीत. प्रजेचे आर्थिक जीवनमान सुधारावे असे त्यांच्या कार्यप्रणालीत नव्हते. आर्थिक क्षेत्रात प्रजेने ज्याचे त्याने पाहावे, असे त्यांचे धोरण असे. त्यांना प्रगतिपथावर नेणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या भक्कम करून सुखी करणे हे त्यांच्या खिजगणतीत नव्हते. जो समर्थ असेल तो टिकेल, दुबळा असेल तो मरेल, ही अर्थनीती होती. सरळ धोपटमार्गाने याच पद्धतीने सारा राज्यकारभार चाले. अशावेळी शाहू

PRINCIPAL
Late Rameah Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

छत्रपतींनी या नीतीला छेद देऊन समाजातील सर्व घटकांचा विचार मनी-मानसी ठसविला होता. यामध्ये शेती आणि शेतकरी यांचाही विचार त्यांच्या केंद्रस्थानी होता. शेती आणि शेतकरी यांच्याबद्दलची त्यांची आस्था कमालीची संवेदनशील होती. आपला सारा देशच शेतीप्रधान आहे. महाराजांचे राज्यही शेतीप्रधान आहे; पण शेतकरी मात्र नाडलेला, अडलेल्या अवस्थेत जगतो आहे हे एक सत्य होते. म्हणून त्यांच्या क्षमतासुद्धा मर्यादित होत्या. कोल्हापूर संस्थानाची त्यावेळची लोकसंख्या आठ ते नऊ लाखांच्या दरम्यान होती. आज ती कितीतरी अधिक आहे. या भूमीचा मुख्य व्यवसाय शेतीच होता. आज उद्योगधंदे वाढले आहेत. सहकारी सूतगिरण्या, साखर कारखाने आणि तत्सम उद्योग, शेतीपूरक उद्योग यांचे जाळे पसरले आहे. महाराजांच्या कारकिर्दीत शेती हा प्रधान व्यवसाय होता; पण शेतीचे लहान-लहान तुकड्यांत विभाजन झाले होते. वाटणी व्यवहाराने अशा लहान तुकड्यांची निर्मिती झाली होती. ती बदलावी आणि त्याचे रूपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे हा त्यांचा विचार होता. म्हणजे शेती किफायतशीर होईल आणि शेतकऱ्याची प्रगती होईल असे त्यांचे स्पष्ट मत होते. हे मत त्यांनी वेळोवेळी बोलून दाखविले आहे. माणगावच्या परिषदेमध्ये भाषण करताना ते म्हणाले, 'तुम्ही साधारण माणसी दहा एकर जमीन वाट्याला येईल असे तुमच्या म्हारकीचे तुकडे करा आणि हे उत्पन्न तुमच्यातील वडील असणाऱ्या व्यक्तीकडे चालवायला द्या. म्हणजे सर्वांना अर्धपोटी राहावे लागते ते वाचेल?' त्यासाठी त्यांनी १९१३ ला अविभाज्य इनामाचा कायदा केला. त्यामध्ये वाटणी करता येणार नाही असे ठरविले. त्यांनी सर्वांसाठी एक महत्त्वाचा संदेशही दिला. ते म्हणत, 'कृषी कर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वत:ला सुख तर होतेच, शिवाय सर्व मनुष्य जातीलाही सुख मिळते. कृषी कर्म करताना क्षात्र धर्माला बाधा येते ही समजूत निखालस खोटी आहे. ज्यावर माणूस समाजाची सुव्यवस्था आणि उन्नती अवलंबून आहे, ते कर्म कमीपणाचे आहे ही समजूत वेडगळपणाची आहे. हे असे कर्म करणारा माणूस समाज खऱ्या अर्थाने क्षत्रिय होय. अन्न माणसाला जगविते. त्याचे पालनपोषण करते. त्याला बलवानही करते आणि इतरांनाही जगवा असा संदेश देते. श्रमाची प्रतिष्ठा जगात मोठी, फारच मोठी आहे. शेती ही श्रमाची प्रतिष्ठाच आहे.'शेती पाण्याखाली येणे अगत्याचे, म्हणून त्यांनी नव्या विहिरी, तलाव, बंधारे, कालवे काढायला प्रोत्साहन दिले. त्यापैकी त्या काळाचा मोठा पाणी प्रकल्प म्हणजे 'राधानगरी धरण'! ही त्यांची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना होय. १९०९ ला या धरणाच्या बांधकामाची सुरुवात झाली. संस्थान लहान, त्याचे उत्पन्न मर्यादित. अशा अवस्थेत या प्रकल्पाला पैसा कमी पडू लागला. अनेक शंकाही उपस्थित होऊ लागल्या. त्यांनी काम तसेच चालू ठेवले. महाराजांच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे हा प्रकल्प. हे त्यांचे भव्य स्मारकच मानायला पाहिजे. मात्र, शाहू छत्रपतींच्या कारकिर्दीत हा प्रकल्प पुरा होऊ शकला नाही. पुढे राजाराम महाराज यांनी तो पूर्ण केला.

**शेतीमधील विविध आधुनिक प्रयोग:**

महाराजांनी शेतीचे विविध प्रयोग आणि त्यासाठी संशोधन यांचाही मागोवा घेतला. जुन्या अवजारांच्या ठिकाणी नवी अवजारे आणण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. त्यासाठी त्यांनी तज्ज्ञांची प्रात्यक्षिके, प्रदर्शने, शेती संस्था असे उपक्रमही सुरू केले. शेतीला उपयुक्त जनावरांची प्रदर्शने त्यांनी घडवून आणली. पारंपरिक पिकांशिवाय नवी पिके घेण्याचा उपक्रम त्यांनी



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

यशस्वीपणे राबविला. पन्हाळा व भुदरगड येथे चहा आणि कॉफीची लागवड करण्याचा प्रयोग केला. शिवाय वेलदोडे, कोको, रबर, ताग, अंबाडी, बटाटे, लाख, ट्रॅपिओका, कंबोडीयन कापूस, आदींची लागवड म्हणजे महाराजांच्या प्रयोगशीलतेचे आणि प्रगतिशीलतेचे द्योतक होय.

'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल', शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड अॅग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले.

उद्योगासंबंधी विचार

उद्योग निर्माणामध्ये ते अग्रेसर ठरले. कोल्हापूरची शाहू मिल हे त्याचे मोठ उदाहरण. येथे पहिल्यांदा सूत आणि नंतर कापड निर्मिती सुरू झाली. इचलकरंजी, कोल्हापूर, शिरोळ, चिंचली, गडहिंग्लज अशा ठिकाणी जिनिंग फॅक्टरी सुरू झाल्या. महाराजांनी माणसांचे जीवनमान सुधारावे म्हणून प्रयत्नांची पराकाष्टा केली. यामागे विचार, रचनात्मकता आणि त्यांची कळकळ होती. हा अष्टावधानी राजा त्या काळचं लेणंच ठरला. अस्पृश्य जनतेबद्दल त्यांना अत्यंत कळवळा होता, म्हणून ते लोक त्यांना देव मानीत. म. फुले आणि वि. रा. शिंदे यांचा अपवाद वगळता शाहू महाराजांइतका जातिभेद गाडून टाकणारा दुसरा पुढारी झाला नाही. एका महान हेतूने प्रेरित झालेला हा राजा त्याच्या निरिच्छ वृत्तीने 'राजर्षी' पदाला पोहोचला. शाहू केवळ राजा नव्हता, केवळ छत्रपती नव्हता, केवळ समाजसुधारक नव्हता, केवळ लोकनेता नव्हता, तर इतिहासाला कलाटणी देणारा आणि एक नवा इतिहास रचणारा महान समाजसुधारक होता.'

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी [ ] त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेले वेदोक्त प्रकरण शाहू महाराजांच्याच काळात झाले.

औद्योगिक विकास हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. म्हणून त्यास देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे. अधिक विकासासाठी औद्योगिकरणाची गरज आहे. राष्ट्राच्या प्रगतीचे मोजमाप हे बऱ्याच अंशी उद्योगावरच अवलंबून आहे. म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी व्यापार, उद्योगांकडे जातीने लक्ष दिले. कारण छत्रपती शाहू महाराजांच्या मते औद्योगिकरणामुळे राष्ट्राचे उत्पन्न तर वाढतेच त्याच बरोबर उद्योगधंदयामुळे फार मोठया लोकांना रोजगार मिळतो. आधुनिक काळात सुद्धा ज्या शहराचे औद्योगिकरण झालेले आहेत त्या शहरात फार मोठया प्रमाणात रोजगार मिळतो. औद्योगिकरणामुळे माणसाच्या गरजा भागवल्या जातात. अन्नधान्यासारखा प्रश्न सुलभ होतो. अंतर्गत, आंतरराष्ट्रीय व्यापारावर त्याचा परिणाम होतो इ. विविध फायदे



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

मिळतात. कोल्हापूरात सध्या जी उद्योग प्रगती दिसून येते जसे कोल्हापूरचा गुळ, कोल्हापूरची चप्पल इ. भारतातच नव्हे तर परदेशातही प्रसिद्ध आहे. अशी जी सर्वस्पर्श प्रगती झाल्याचे दिसून येते. तिची मुहूर्तमेढ भारतात शाहू, महाराजांनी केली आहे..

"छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या देशाचा विकास कशा प्रकारे करता येईल हे संपूर्ण पणे ओळखले होते. किंवा जाणून घेतले होते. छत्रपती शाहू महाराजांच्या मते आपल्या देशाची उन्नती करायची असेल तर आपल्याला उद्योग धंदे उभारावे लागतील आणि उद्योग धंद्याला महत्त्व द्यावे लागेल. भारतासारख्या कृषीप्रधान देशामध्ये अनेक असे उद्योग धंदे. सुरू करता येतात. देशा मधील उद्योग धंद्याचा विकास झाला तरच आपल्या सर्वांचा विकास होईल. या दृष्टीने शेतीच्या आधारावर बरेच उद्योग धंदे करता येतील. छत्रपती शाहू महाराज एका ठिकाणी असे म्हणतात "आप सहकारी कारखाने, सहकारी संस्था और सहकारी दुकाने खोलिए, इसके लिए आपको जो भी मद्द चाहिए, मैं दूंगा !" अशा प्रकारे छत्रपती शाहू महाराजांनी आश्वासन देऊन सहकाराच्या मदतीने औद्योगिकरण कशा प्रकारे करता येईल हे सांगितले आणि हे सांगुन ते थांबले असे नाही, तर व्यक्ती त्यांनी प्रत्यक्षात करून सुद्धा दाखविले.

व्यक्ती आणि राष्ट्राच्या विकासात आधुनिक ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग महत्वाचा आहे. त्यासाठी प्रत्येक व्यवसाय हा प्रगत ज्ञान विज्ञानाच्या अभ्यासाची जोडदेऊन केला पाहिजे. या बाबत त्यांनी सन १९१७ साली खामगाव येथे संपन्न झालेल्या शेतकऱ्यांच्या सभेत मार्गदर्शन करतांना जाहिरपणे सांगीतली. आपल्या या भाषणात ते पुढे म्हणतात.

"आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन रहावे ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही. म्हणून व्यापार धंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यात आम्हास शिरण्याची जरूरी आहे. हल्ली व्यापार व उदीम यात आम्ही पडतच नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती व्यापार व तत्संबंधी चळवळ यावर अवलंबून आहे. खरोखर व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्रांचा धर्म झाला आहे. येथे धर्म म्हणजे बुद्धीयुक्त स्वहित साधने असे मी समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील. व्यापारासंबंधीच्या चळवळीवर माझा पूर्ण विश्वास असल्यामूळे मी माझ्या दोघा मुलांना व दुसऱ्या जवळच्या आप्तांना व्यापारात घातले आहे. आणि मला सांगण्यास समाधान वाटते. की, त्यांनी तो धंदा मोठया आनंदाने स्वीकारला आहे. एवढेच नाही तर त्यात ते चांगल्या रितीने पुढे येत आहेत. शेतकीच्या व्यवसायामध्ये जरी आमच्यातील बहुतेक लोक गुंतले आहेत. तथापी त्यातसुद्धा शिक्षणाची आम्हास जरूरच आहे. शिक्षणाची जरूरी नाही अशी कोणतीही चळवळ नाही. आम्ही कसे खावे, श्वास कसा घ्यावा हे ही आम्हास शिकले पाहिजे हे सांगणे जरा चमत्कारीक दिसते. तथापी ही गोष्ट खरी आहे. हल्लीच्या काळात शेतकरी इतकी काही पद्धतशीर झाली आहे की, ज्याला यात यश मिळवाययचे आहे. त्या त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व समजली पाहिजेत.""

छत्रपती शाहू महाराजांनी आर्थिक विकासातील औद्योगिकरणाचे महत्त्व ओळखले होते. त्याचप्रमाणे भांडवलदारी किंवा सरकारी मक्तेदारीच्या दुष्परीणामाचीही त्यांना जाणीव झालेली होती. त्यामुळे त्यांनी खाजगी क्षेत्रातील उद्योग त्याच प्रमाणे संयुक्त क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावरील आणि सहकारी क्षेत्रातील उद्योगांना खरोखरीचे आर्थिक सहाय्य आणि वित्तीय प्रोत्साहन देऊन



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

चालना देण्याचा प्रयत्न केला. साधन सामग्रीचे योग्य वाटप व नियंत्रण करून कारखानदारी शेती उत्पादनातील तांत्रिक ज्ञान यांच्यात वाढ झाली पाहीजे अशा तऱ्हेची विधायक दृष्टी महाराजांनी दिली. त्याचा आढावा घेतांना संजय जोगदंड म्हणतात.. "दादाभाई नैरोजींनी दारिद्रयाचा अभ्यास केला पण त्यांची दृष्टी ही टीकात्मक होती. परंतु महाराजांनी व्यापार व उद्योग यांचे महत्व ओळखले दरडोई उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला यातून दरडोई उत्पन्न व सर्वसामान्य जनतेचे आणि शेतकऱ्यांचे राहणीमान वजीवनमानाचा दर्जा वाढला पाहिजे अशा तऱ्हेचे आर्थिक धोरण महाराजांनी स्वीकारले. महाराजांच्या आर्थिक धोरणामागे उत्पन्न व संपत्तीच्या बाबतीतील विषमता नष्ट करणे, किमान वेतन व रोजगाराची हमी देणे, खाजगी क्षेत्रातील सर्वोत्तम बाबींचा उपयोग समाजास व्हावा. या दृष्टीने प्रयत्न करणे या उद्दिष्टाचा समावेश होता. या पाठीमागे सामान्य जनतेच्या हिताची दृष्टी होती. हे आर्थिक धोरण अंमलात आणण्यासाठी त्यांनी सार्वजनीक प्रशासनाचा विस्तार व पुनर्रचना केली. मागासलेल्या दलितवर्गाचा दुबळेपणा नष्ट करून कारखानदार, कारागीर यांचे उत्पन्न व उत्पादन शक्ती वाढविण्यासाठी त्यांनी स्वस्त दराने कर्जाचा पुरवठा केला. मालाला वाढती मागणी यावी म्हणून संघटीत बाजारपेठा बसविल्या. सहकारी क्षेत्राचा जोरदार पुरस्कार केला. त्यासाठी सहकारी पतपेढया सहकारी ग्राहक भांडार व उद्योगधंदे काढले. उद्योग व व्यापाराला चालना देण्यासाठी त्यांनी सार्वजनिक कर्ज उभारणी केली. प्रजेचे हित व उत्कर्ष यासाठी कोल्हापूरातील पैसा कोल्हापूरात राहून त्याचा फायदा प्रजेला इतिहासातील कोणत्याही कालखंडाचा आपण अभ्यास केला तर आपल्याला असे • दिसून येते की, प्राचीन भारतात, मध्ययुगीन भारतात किंवा आधुनिक भारतात त्याच बरोबर आधुनिक जगाच्या इतिहासात कृषी, व्यापार आणि उद्योगाला फार महत्व होते. शेती, व्यापार-उद्योग हयामुळे भौतिक प्रगती होत असते. युरोपियन देशाचा कृषी व्यापार उद्योग पाहिला तर आपण त्यांच्या पेक्षा बरेच मागे आहोत हे स्पष्ट दिसून येते. हे छत्रपती शाहू महाराजांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांची मानसिकपातळीवर होणारी घालमेल स्पष्ट करतांना जयसिंगराव पवार लिहितात "व्यापार-उद्योगात आपण मागे पडल्याने आपले भयानक आर्थिक शोषण होऊन आपले पारतंत्र्य आधिक दुःखदायक झाले आहे असे त्यांना वाटत होते. आपल्या लोकांनी विशेषतः मराठी माणसांनी व्यापार-उद्योगात शिरावे आणि आपल्या बरोबर देशाचीही प्रगती करावी. एकूण प्रत्येक समाजव्यवस्थेचा कणा म्हणजे त्या राष्ट्राची आर्थिक परिस्थिती असते. हा कणा जर ताठ आणि मजबूत असेल तर समाजपुरुष ताठपणाने आपला उदरनिर्वाह करू शकतो. परंतु हा कणाच भक्कम नसल्यास तो अगदी दुर्बल व पंगू बनतो. ही बाब लक्षात घेऊन "छत्रपती शाहू महाराजांच्या पूर्वी एकूणच समाजाचे राहणीमान, उत्पादनाची साधने, उत्पादनाची पद्धती आणि उत्पादनाचे तंत्र, प्रशासन, सरदार, जहागीरदार, सुभेदार व त्यांचा फौजफाटा आणि सामन्य प्रजा यांच्यातील परस्पर संबंध आणि जीवनमानातील फरक इत्यादी आणि सर्व घटनांचा सखोल अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे आहे.

**छत्रपती शाहू महाराज पूर्व कालखंडातील महाराष्ट्रातील आर्थिक स्थिती:**

छत्रपती शाहू महाराजांच्या पूर्व कालखंडातील महाराष्ट्रातील आर्थिक स्थितीचा अभ्यास करायचा झाला तर पेशव्यांचा काळ, महात्मा फुलेंचा काळ तसेच इंग्रजांच्या काळातील आर्थिक

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

धोरण पाहावे लागेल. पेशव्यांचा दुर्बल व अकार्यक्षम प्रशासन व्यवस्था आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष केले. उत्पन्नापेक्षा खर्चाच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली परिणामी राज्याची आर्थिक स्थिती भक्कम होऊ शकली नाही. दिवाळखोरी व कर्जबाजारीपणा याच्यात वृद्धी झाली. या उलट युरोपमध्ये औद्योगिक क्रांती होऊन संपूर्ण युरोपची सर्व क्षेत्रात प्रचंड प्रगती झाली होती. परंतु भारतीयांना युरोपीयनांच्या आगमनापर्यंत औद्योगिक क्रांतीविषयी कुठलीही कल्पना नव्हती. उद्योग व व्यापाराचा विकास भारतात झालेला नव्हता. उद्योग स्थापन करण्यासाठी लागणारे गुण म्हणजे मेहनत, साहस आणि चिकाटी यांचा भारतीयांमध्ये मोठा अभाव होता. "इंग्रजांनी भारतातून कच्चा माल इंग्लंडला नेऊन त्याचे पक्क्या मालात रूपांतर करून तो दुप्पट भावाने भारतात विकावयास सुरूवात केली. परकीय वस्तूंची मोठया प्रमाणावर भारतात आयात होऊ लागल्यामुळे त्याचे भारतीयांना गंभीर परिणाम भोगावे लागत होते. येथील उद्योगधंदे कारागीर, व्यवसायीक यांच्यावर अत्यंत वाईट परिणाम होऊन भारतीय अर्थव्यवस्थेचे कंबरडेच मोडकळीस आले होते. अर्थव्यवस्थेच्या नाड्या पाश्चात्य, नालायक व भ्रष्ट भारतीय अधिकारी वर्गाच्या हाती गेल्या होत्या.

भारतीय अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा घटक म्हणजे येथील शेतकरी वर्ग होता. तो तर अज्ञान, निरक्षरता, रूढी, परंपरा, कर्मकांड, अंधश्रद्धा इत्यादी अनेक वाईट गोष्टींच्या भोवयात अडकल्यामुळे विकास अथवा प्रगती त्यांच्यापासून तो शेकडो मैल दूर होता. अशा प्रकारे छत्रपती शाहू महाराजांच्या पूर्व काळात शेतकऱ्यांची स्थिती वाईट होती.

**व्यापार व दळणवळण**

कोणत्याही राष्ट्राच्या अर्थकारणावर मोठा प्रभाव असणारा घटक म्हणजे व्यापार, शाहू महाराजांच्या पूर्वी महाराष्ट्रातील व्यापार व दळणवळणाची स्थितीगती विचारात घेण्याची गरज आहे.

इंग्रज कंपनीच्या काळात भरभराटीला आलेली भारतातील पहिली औद्योगिक नगरी म्हणजे 'मुंबई' शहर होय. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असलेले हे शहर इंग्रजांचे दक्षिणेतील एक महत्वाचे व्यापारी केंद्र होते. परंतु या औद्योगिक प्रगतीबरोबरच महाराष्ट्रातूनच नव्हे तर संबंध देशभराच्या ग्रामिण भागातून आलेल्या शूद्रातिशूद्राचे शोषण करण्यास सुरूवात केली. शूद्रांतिशूद्राचा हा वर्ग कामगार म्हणून अहोरात्र कष्ट करीत होता. या काळातील व्यापार व दळणवळणाच्या संदर्भात अभ्यासक हरि नरके लिहितात. "१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारताच्या औद्योगिकरणाला सुरुवात झाली. त्याला अमेरिकेतील यादवीयुद्ध हे विशेषत्वाने कारणीभूत ठरले. असेच म्हणाले लागेल इ.स. १८६१ ते इ.स. १८६५ हया काळात झालेल्या युद्धामुळे इंग्लंड मधील कापड गिरण्यांना अमेरिकेतून होणारा कापसाचा पुरवठा झपाटयाने कमी होऊ लागल्याने इंग्लंडमधील कापड गिरण्या भारतातून मोठया प्रमाणावर कापसाची खरेदी करू लागल्या इ.स. १८६० मध्ये भारतातून इंग्लंडमध्ये निर्यात होणाऱ्या कापसाच्या गाठीची एकुण संख्या सुमारे ४ लाख २२ हजार होती. इ.स. १८६६ मध्ये सुमारे १६ लाख १९ हजारांपर्यंत म्हणजेच ४ पटीने वाढली होती. परिणामी त्यामुळे अगदी अल्पावधीत मुंबई शहराला आंतराष्ट्रीय बाजारपेठेत विशेष महत्व प्राप्त झाले.



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

"इ.स. १८४८ ते १८५६ या लॉर्ड डलहौसीच्या काळात दळणवळण आणि वाहतुकीच्या क्षेत्रात वेगाने प्रगती होऊ लागली. इंग्रजांनी भारतात सार्वजनिक बांधकाम खात्याची स्थापना करून अनेक लोककल्याणकारी योजना हाती घेतल्या. अनेक ठिकाणी पक्के रस्ते बांधण्यात आले, रेल्वे मार्गाची उभारणी होऊ लागली त्यातून १६ एप्रिल १८५३ रोजी मुंबई ते ठाणे दरम्यान देशातील पहिल्या रेल्वे मार्गाची उभारणी करण्यात आली. इ.स. १८६० पर्यंत बोरघाटच्या पलीकडे रेल्वेचा विस्तार होऊन मध्य भारतातील कापूस उत्पादक क्षेत्र रेल्वे मार्गाने जोडण्यात आले. अहमदाबाद व गुजराथ येथील प्रमुख कापूस उत्पादन ठिकाणेही रेल्वेमार्गाने जोडण्यात आले.

इ.स. १८५० पर्यंत शिडाच्या बोटीच्या सहाय्याने समुद्रमार्ग व्यापार चालत असे. त्यामुळे प्रवासात अनेक अडचणी अथवा धोके उद्भवत असत. परंतु सन १८५० नंतर मात्र शिडाच्या बोटी जाउन आगबोटीची आधुनिक व्यवस्था निर्माण झाली. परिणामी व्यापार झपाटयाने वाढू लागला. त्यातच इस. १८६९ मध्ये सुवेझ कालवा खोदण्याचे काम पूर्ण " झाल्याने युरोप आणि भारत यांच्यातील अंतर कमी होऊन ते अत्यंत जवळ आले. उद्योग धंदयासाठी लागणारा कच्चा माल कारखान्यात नेणे व तयार झालेला पक्का माल तेथुनः बाजारपेठा पर्यंत आणने हे काम दळणवळण व वाहतूकीच्या उपलब्धतेमुळे अगदी सहज शक्य झाले.

**उद्योधंद्याच्या क्षेत्रातील प्रयोगशीलता :**

छत्रपती शाहू महाराजांनी शेतीच्या क्षेत्रात नव नवीन प्रयोग घडवून आणले होते... त्याच प्रमाणे संस्थानात नवे उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्रात सुद्धा नवनविन प्रयोग घडवून आणले. छत्रपती शाहू महाराजांनी स्वतः अनेक नवे उद्योग सुरू केले. तर कांही उद्योग लोकांनी सुरू करावेत म्हणून त्यांना त्यांनी प्रोत्साहन व चालना दिली. त्या नुसार छत्रपती शाहू महाराजांनी व्यावसायीक शिक्षणाचा देखील पाया आपल्या संस्थानात घातला.

"स. १९०३ मध्ये त्यांनी कोल्हापूरात 'ओब्रायन टेक्नीकल स्कुल' ची स्थापना केली. तेथे वेगवेगळया उद्योगांसाठी त्यांनी शिक्षणाची व्यवस्था केली. व्यवसायीक शिक्षण सर्वांना मिळाले तरच समाजाची आर्थिक प्रगती होईल असे त्यांचे मत होते. पुढे 'छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर' सुरू झाल्यामुळे तर संस्थानातील लोकांना वेगवेगळे व्यावसायीक शिक्षण घेण्याची सुवर्णसंधीच मिळाली. "६

छत्रपती शाहू महाराजांनी १९०५ सालापर्यंत कोल्हापूर संस्थानात अनेक उद्योग सुरू केले होते. आज आपल्याला शाहू महाराजांनी जे उद्योग सुरू केले ते फार थोडया प्रमाणात होते, असे दिसत असले तरी ज्या काळी मुंबई–कलकते या शहरात उद्योग धंद्याचा विकास झाला नव्हता. त्या वेळेस कोल्हापूरात महाराजांनी नवनवीन उद्योग सुरू केल्याचे दिसून येते. "छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूरात प्रामुख्याने पुढील उद्योग सुरू केले.

१. सुगंधी औषधी तेल उद्योग ,

२. मधुमक्षिका पालन उद्योग

Essential Oil Industry, Bee-Keepin Industry, Wood Distillation Industry

३. काष्टार्क उद्योग



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

४. सुती कापड उद्योग Cotton Textile Industry

१९०४ साली शाहू महाराजांनी जपानमध्ये प्रशिक्षित झालेल्या टी. एस. शालीग्राम नावाच्या रसायनशास्त्रज्ञ व्यक्तीची नेमणूक आपल्या संस्थानात 'इंडस्ट्रीयल इन्स्पेक्टर' म्हणून केली होती. जंगल संपत्तीवर आधारीत काही नवे उद्योग, संस्थानात सुरू करण्याचा महाराजांचा मानस होता. त्या दृष्टीने शालिग्राम यांनी 'सुगंधी औषधी तेल उद्योग' व 'काष्टार्क तेल उद्योग' या क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर काही वनौषधी तेलांचे व काष्टकांचे यशस्वी उत्पादन केले होते. मुंबईत भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात कोल्हापूर संस्थानात उत्पादित झालेल्या अशा प्रकारच्या तीन मुंगधित औषधी तेलांचे नमुने पाठविण्यात आले. विशेष म्हणजे या प्रदर्शनात ही कोल्हापुरी तेले तज्ञांच्या प्रशंसेस पात्र ठरून कोल्हापूर संस्थानास चांदीचे पदक बहाल करण्यात आले.

*१९०४-१९०५ चा कोल्हापूर संस्थानचा प्रशासकीय अहवाल सांगतो की, तेथील तज्ञ परीक्षकांनी आपल्या ऑफिशियल गाईड बुकर मध्ये या तेल उत्पादनाचे कौतूक करतांना पुढील शेरा लिहला होता. 'The Industry of Essential Oils in the state (i.e. Kolhapur State) is quite a new departure and one not yet taken up by any other native state"

छत्रपती शाहू महाराज राज्य करीत होते तेव्हा भारतात अनेक ठिकाणी लहान-मोठे संस्थाने होती. परंतु छत्रपती शाहू महाराजांनी जी तेलाच्या उद्योगात क्रांती व प्रयोग करून दाखविले तशा प्रकारे इतर कुठल्याही संस्थांनी केले नाहीत. म्हणून वरील कौतुक तज्ञांनी केले असावे.

सुगंधी तेलाबरोबरच छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात काष्टार्क उद्योगातही फार मोठ्या प्रमाणात यश मिळविले, "सह्याद्रीच्या वनविभागात मिळणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या वनस्पतीच्या लाकडाच्या भट्या लावून त्यापासून लोणारी कोळसा, बिहनिगर आणि डांबर हे पदार्थ यशस्वीरीत्या उत्पादित केले गेले आणि त्यांचे नमुने मुंबई कलकत्ताच्या 'चेंबर ऑफ कॉमर्स' या संस्थेकडे एवढेच नव्हेतर अमेरीका व जपान या देशांबील प्रयोगशाळांकडे तज्ञांच्या परीक्षणासाठी पाठवलले गेले (इ.स. १९०५-०६) विविध प्रकारच्या रंग निर्मित उद्योगात हे काष्टार्क मोठया प्रमाणावर लागत असल्याने त्यांची निर्मिती व्यापारी तत्त्वावर फायदेशीर ठरू शकणार होती. काष्टार्क तयार करण्याचे प्रयोग पुढे अनेक वर्ष चालू होते. कांही काष्टार्क म्हैसूरच्या औद्योगिक प्रदर्शनात ठेवले गेले. तेथेही त्यांची शास्त्रीय गुणवत्ता तज्ञांच्या पसंतीस पडून त्यांच्या उत्पादनाबद्दल कोल्हापूर संस्थानाला चांदीचे पदक देण्यात आले. (स. १९१९)*

छत्रपती शाहू महाराजांचा तिसरा प्रयोग म्हणजे 'मधुमक्षिका पालन उद्योग' या प्रयोगातून छत्रपती शाहू महाराजांची कल्पकता किती होती हे तर दिसून येतेच त्याच बरोबर महाराजांची दूरदृष्टी किती मोठया प्रमाणात होती हे देखील स्पष्टपणे जाणवते आणि या दोन्ही गुणातून महाराजांची प्रयोगशीलता दिसून येते. कारण सह्याद्रीच्या डोंगरावरील वनश्री बारमास फळाफुलांनी बहरलेली त्याचा फायदा मक्षिकापालन उद्योग करता येइल आणि शेतकन्यास तो जोडधंदा म्हणून करता येईल असे महाराजांना वाटले. आणि लगेच महाराजांची या उद्योगाविषयी कुठून माहिती मिळेल याची चौकशी सुरू केली. कोल्हापूर संस्थानात हा उद्योग तर नव्हताच परंतु मुंबई इलाक्यातसुद्धा हा उद्योग नव्हता. या पार्श्वभूमीवर या उद्योगाचा शास्त्रीय अभ्यास करूनच



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
College, Sonpeth Dist. Parbhani

या उद्योगाचा विकास करावा हा हेतू ठेवून "छत्रपती शाहू महाराजांनी चिटणीस नावाच्या आपल्या अधिकाऱ्यास कलकत्यातील 'डायरेक्टर ऑफ अॅग्रीकल्चर' कडे धाडले. पण तेथेही निराशा पदरी पडली. त्यांच्याकडेही या उद्योगाचे प्रशिक्षण देण्याची यंत्रणा नव्हती लवकरच महाराजांना समजून चुकले की संबंध हिंदुस्थानातः कुठेच हा उद्योग व्यपारी तत्वावर केला जात नाही. तसेच त्या विषयीचे प्रशिक्षण मिळण्याची अथवा व्यावहारिक ज्ञान देण्याची कुठेच सोय नाही. या संदर्भात महाराजव व त्यांचे मुंबईतील इंग्रज स्नेही मॅकनील यांच्यातील पत्रव्यवहार पाहण्या सारखा आहे. मॅकनील महाराजांना लिहतात. "Mr. D.H. Chitnis has Just wired to me from Calcutta has seen the director of Agriculture Dr. Watt but can get no Practical information are dead. don't think that Mr. Chitnis can do any good by remaining. He will do atleast as much by reading up best text books and doing what he can with the best Kolhapur. He will probably make mistakes but if he uses of good protective bee-dress he will acquire confidence and knowledge should follow' मैकनील यांना उत्तरादाखल पाठविलेल्या पत्रात महाराजांनी म्हटले. We have tried out best here to bring up the bless, I am quite sure that with a little more practical knowledge we should have success and it was with that view that. I sent chitins to see how the thing is actually worked. But is seems there is hot a single place in India where the industry is taken up seriously. I have now asked him to see the editor of the "Indian Agriculturist" if the fails to get information even in that quarter then we must shift for ourselves as advises by you (March-1903).

**संदर्भ सूची,**


- दैनिक लोकमत श्यामकांत जाधव लेख
- शाहू महाराज विकिपीडिया
- शाहू महाराज गौरव ग्रंथ
- www shahu.com
- गोविंद पानसरे, राजर्षी शाहू शेती धोरण आणि विचार॰
- प्रा. वेदकुमार वेदलंकार, क्रांती के अग्रदुत राजर्षी शाहू महाराज
- प्रदिप गायकवाड, राजर्षी शाहू महाराजांचे निवडक भाषणे आणि आज्ञापत्र
- संजय जोगदंड, 'राखीव जागांची मुहूर्तमेढ रो
- डॉ. जयसिंग पवार, "शाहू स्मारक ग्रंथ'
- हरी नरके, महात्मा फुले, शोधल्या नव्या वाटा.


* * *

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani